# फायनान्स अ‍ॅण्ड अकाउंट्स एम्प्लॉईज युनियन

प्लॉट नं. १२, रवी नगर, धुळे रोड, अमळनेर, जळगाव ४२५ ४०१

(रजि.नं. एनएसके/जे/२३८२)

| विशाल लोहार | विजय जाधव | प्रितम घोगरे |
|---|---|---|
| अध्यक्ष | महासचिव | उपाध्यक्ष |
| ९६६५२०२७३६ | ९३०९८१७९८३ | ९३७०९३१५९२ |

संदीप तिकटे
कोषाध्यक्ष
९७६६२०९६७८

प्रशांत नरड
प्रसिद्धी प्रमुख
९१४६६८६२२०

लक्ष्मीकांत पवार
सहसचिव
९६६५३०५५७७

विलास लकडे
सहसचिव
९६३७४१५४४५

स्नेहल वैष्णव
महिला प्रतिनिधी
९६३७४१५४४५

परेश कलंत्री
संघटक
९७६७४०१४५३


जा.क्र.FAEU/ मु.कार्यालय/००१५ दिनांक: १५ /१०/२०२५

प्रति,
मा. संचालक (मा.सं.),
महावितरण मुख्यालय, प्रकाशगड, मुंबई.

**विषय** : दिनांक २२/०९/२०२५ रोजीच्या Draft MPR मध्ये मांडलेल्या पुनर्रचनेतील अडचणी व सुधारणा सादर करणेबाबत.

**संदर्भ** :
1. दि. २५ मार्च २०२५ रोजी पुनर्रचना समिती व मुख्यालय प्रशासनास सादर केलेले १३१४ लेखा कर्मचारी यांच्या स्वाक्षरीसह सुधारणात्मक निवेदन.
2. दि. १० सप्टेंबर २०२५ रोजी मा. मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांना पाठविलेले विचारणा पत्र.
3. दि. १२ सप्टेंबर २०२५ रोजी मुख्यालयास मेलद्वारे मागितलेली माहिती.
4. दि. १७ सप्टेंबर २०२५ रोजी व्यवस्थापन संचालकांना सादर केलेले आक्षेप व सुधारणा संदर्भातील पत्र (जा.क्र.FAEU/मुख्य.का./0010).
5. दि. २४ सप्टेंबर २०२५ रोजी मा. मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री यांना सादर केलेले निवेदन. (जा.क्र.FAEU/मुख्य.का./0012)
6. दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी मा. संचालक (मांस) व संघटनेसोबत पार पडलेली बैठक.
7. जा.क्र.FAEU/ मु.कार्यालय/००१३ दिनांक: ०७ /१०/२०२५.

**महोदय,**

महावितरण मध्ये होत असलेल्या पुनर्रचना तसेच इतर विषयाच्या अनुशंगाने संघटनांनी संप पुकारला होता. **दि.३०.०९.२०२५ रोजी आपल्या सोबत संघटनेची मिटिंग पार पडली त्यातील निष्कर्षानुसार व आपण केलेल्या आवाहनाचा मान ठेवून सदरील दि.०९.१०.२०२५ रोजी पुकारलेल्या संपात न उतरता प्रशासनाकडे कंपनी तसेच कर्मचारी हिताचा विचार करून पुनर्रचनेतील लेखा संवार्गाबाबत आवश्यक बदल सुचवीत आहोत.** त्याचा समावेश पुनर्रचनेत करण्यात यावा.आपण बैठकीत निर्देशित केले प्रमाणे अडचणी व अपेक्षित सुधारणा आपणाकडे संदर्भ क्र ७ नुसार प्रस्तावित केले आहेत. काही मुद्दे खालील प्रमाणे त्यात समाविष्ट करून घेण्यात यावेत.

1. प्रत्येक ग्रामीण उपविभागातील एक LDC recovery wing मध्ये देण्यात आलेला आहे. बऱ्याच ग्रामीण उपविभागातील ग्राहक संख्या 30 हजार पेक्षा जास्त वाढ झालेली आहे अश्या ठिकाणी लेखा विभागामध्ये अतिरिक्त मनुष्यबळ आवश्यक असताना लेखा विभगातील पारंगत असलेला LDC recovery wing मध्ये दिल्यामुळे कमी मनुष्याबळाअभावी त्याचा ग्राहकसेवेवर विपरीत परिणाम होईल तसेच दिल्यास बिलिंग टीम कमकुवत होऊन सदर

संदीप तिकटे
*कोषाध्यक्ष*
९७६६२०९६७८

प्रशांत नरड
*प्रसिद्धी प्रमुख*
९१४६६८६२२०

लक्ष्मीकांत पवार
*सहसचिव*
९६६५३०५५७७

विलास लकडे
*सहसचिव*
९६३७४१५४४५

स्नेहल वैष्णव
*महिला प्रतिनिधी*
९६३७४१५४४५

परेश कलंत्री
*संघटक*
९७६७४०१४५३


बाबीचा परिणाम कार्यालयीन बिलिंग महसूल व बिलिंग मापदंडावर होईल.

**प्रस्तावित उपाय**

सदर बाबीमुळे बिलिंग ची गुणवत्ता ढासळून मोठ्या प्रमाणात कामाचा अवास्तव बोजा लेखा विभागावर पडणार आहे.केवळ डेटा एन्ट्री करिता रिकव्हरी आणि स्टोअर सारख्या ठिकाणी कर्मचारी यांची पुनर्रचनेत नियुक्ती करून एका डेटा एन्ट्री सहायका सारखी सहाय्यकांची कामे सोपवली आहेत. त्यासाठी त्यांचा वापर करून त्यांच्या कार्यकुशलतेचा अपव्यव होणारआहे.ग्राहकांचा मोठा कल उपविभागीय कार्यालय येथे येत असल्यामुळे त्या ठिकाणी कार्यरत LDC हे पद लेखा विभागातील बिलिंग टीम मध्येच ठेवण्यात यावे.

2. स्थानिक पातळीवर क्षेत्रीय कार्यालयांना पुनर्रचनेत बदली धोरण राबविताना कुठल्याही प्रकारच्या मार्गदर्शक सूचना जाहीर केलेल्या नाहीत तसेच कर्मचाऱ्यांच्या पुनर्रचनेत पदस्थापना करतेवेळी मनमानी पद्धतीने बदली तसेच पद स्थापना करण्यात आलेली आहे.

**प्रस्तावित उपाय**

याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी करण्यात याव्यात तसेच त्याचे काटेकोरपणे पालन करण्यासंदर्भात सूचना देखील देण्यात याव्यात. जेणेकरून प्रायोगिक तत्वावर सुरु असलेल्या पुनर्रचनेत पदस्थापना करतेवेळी ज्या ज्या कार्यालयातील सद्यस्थितीत कार्यरत कर्मचारी यांची बदली करण्यात येणार आहे त्यांची अन्यायकारक रित्या बदली केली जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

3. पुनर्रचनेमध्ये मंडळ कार्यालयातील लेखा विभागाचा नमौलेख हा “Accounts and Collection Section” असा करण्यात आला आहे व विभागीय कार्यालयातील उपव्यवस्थापक पदाचा नमौलेख हा उपव्यवस्थापक (B&R) असा करण्यात आलेला आहे. (नवीन कृती आराखडा नुसार/PPT).

**प्रस्तावित उपाय**

मंडळ कार्यालयातील लेखा विभागाचा नमौलेख हा “Accounts and Audit Section” असा उल्लेख करण्यात यावा व कंपनीचे परिपत्रक क्र ३४४ नुसार विभागीय कार्यालयातील उपव्यवस्थापक पदाचा नमौलेख तो उपव्यवस्थापक (वि व ले ) हाच असावा.

4. ज्या शहरी उपविभागात पुनर्रचना लागू होणार आहे सध्या तेथील १४९ शहरी उपविभागांमध्ये ८९४ लेखा कर्मचारी करतात परंतु प्रस्तावित पुनर्रचनेत हेच काम फक्त ५९२ कर्मचारी यांच्यावर टाकून तब्बल ३०२ पदे बिलिंग कामांतून कमी करण्यात आली आहेत.प्रत्येक उपविभागातून एक LDC (A/C) हे पद कमी करून ते रिकव्हरी टीम ला देण्यात आले आहे.एकूणच परिस्थितीत पाहता पुनर्रचनेत बिलिंग चे काम पार पाडण्यासाठी जे मनुष्यबळ ३७४९ पाहिजे होते ते १९७३ एवढ्या तुटपुंज्या कर्मचारी संख्येवर लादण्यात येत आहे.

# फायनान्स अँण्ड अकाउंट्स एम्प्लॉईज युनियन

प्लॉट नं. १२, रवी नगर, धुळे रोड, अमळनेर, जळगाव ४२५ ४०१
(रजि.नं. एनएसके/जे/२३८२)

विशाल लोहार
अध्यक्ष
९६६५२०२७३६

विजय जाधव
महासचिव
९३०९८१७९८३

प्रितम घोगरे
उपाध्यक्ष
९३७०९३१५९२

संदीप तिकटे
कोषाध्यक्ष
९७६६२०९६७८

प्रशांत नरड
प्रसिद्धी प्रमुख
९१४६६८६२२०

लक्ष्मीकांत पवार
सहसचिव
९६६५३०५५७७

विलास लकडे
सहसचिव
९६३७४१५४४५

स्नेहल वैष्णव
महिला प्रतिनिधी
९६३७४१५४४५

परेश कलंत्री
संघटक
९७६७४०१४५३


**प्रस्तावित उपाय**

**वर्षानुवर्षे बिलींग मधील कामाचा तथा दिवसभरात विविध प्रकारची कामे पार पाडणाऱ्या कर्मचाऱ्यांना केवळ एका डेटा एन्ट्री सारखी सहाय्यकांची कामे सोपवली जाऊ नयेत. बिलिंग विभागातील कार्यरत कर्मचारी यांची पदस्थापना पूर्वीप्रमाणेच बिलिंग टीम मध्ये करण्यात यावी.**

5. पुनर्रचनेतील B & R उपविभागातील प्रचंड ग्राहकसंख्या वाढल्यामुळे उपविभागातील बिलिंग बाबतची जबाबदार कामे पार पाडण्यासाठी व बिलिंग टीम मधील कर्मचाऱ्याकडून काम पार पाडून घेण्यासाठी तसेच दोन्ही सहायक लेखापाल व टीम मधील समन्वय साधून काम पूर्ण करण्यासाठी गोंधळाची परिस्थिती तयार होत आहे.

**प्रस्तावित उपाय**

नवीन पुनर्रचनेतील B & R उपविभागातील प्रचंड ग्राहकसंख्येचा विचार करता शहरी उपविभागामध्ये ज्याप्रमाणे अतिरिक्त कार्यकारी अभियंता हे पद असते त्याच धर्तीवर शहरी B & R उपविभागामध्ये उप व्यवस्थापक (वि व ले ) हे पदनिर्मित करण्यात यावे जेणेकरून शहरी उपविभागामध्ये सर्व प्रकारची महत्वपूर्ण कामे विहित मुदतीत केवळ संख्यात्मक पद्धतीनेच नव्हे तर गुणवत्ता पूर्ण पार पाडली जातील.

**तरी उपरोक्त बाबींचा व संदर्भ क्र ७ नुसार देण्यात आलेल्या उपाययोजनांचा सकारात्मक विचार करूनच अंतिम MPR आदेश लागू करण्यात यावा हि नम्र विनंती.** प्रशासनाने अंतिम MPR मध्ये अपेक्षित बदल केले नाहीत तर संघटना न्याय मिळवण्यासाठी **न्यायिक प्रक्रियेत** विश्वास ठेवते. संघटनेचे सदस्य, महावितरण कंपनी व ग्राहक सेवा यांच्या हिताकरिता आवश्यक ती भूमिका संघटना कोणत्याही परिस्थितीत पार पाडेल. तरी आपण अंतिम MPR आदेश लागू करतेवेळी संघटनेच्या वाजवी मतानुसार बदल कराल हीच अपेक्षा.

अध्यक्ष
**विशाल लोहार**

महासचिव
**विजय जाधव**

**प्रत सविनय सादर.**

1. मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महावितरण मुख्यालय, प्रकाशगड, मुंबई.
2. मा. संचालक (संचलन), महावितरण मुख्यालय, प्रकाशगड, मुंबई.
3. मा. संचालक (वित्त), महावितरण मुख्यालय, प्रकाशगड, मुंबई
4. मा. अध्यक्ष, पुनर्रचना समिती, महावितरण मुख्यालय, प्रकाशगड, मुंबई.
5. मा. मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महावितरण मुख्यालय, प्रकाशगड, मुंबई.